महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

क्र.मासंवि/रवका/न.क्र.५/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ४४१ दि. २९ / १२ / २०१२

विषय : कंपनीकडून वाहन सुविधा मिळण्यास पात्र असणाऱ्या मुख्य कार्यालयातील अधिकाऱ्यांकडून कार्यालयीन कामकाजासाठी स्वतःच्या खाजगी वाहनाचा वापर
- प्रतिपूर्तीची रक्कम सुधारीत करण्याबाबत.

संदर्भ : प्रशाकीय परिपत्रक क्र. ३५६, दिनांक ०६/०९/२०११.

.....

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतील वाहन सुविधा मिळण्यास पात्र असलेल्या मुख्य कार्यालयातील अधिकाऱ्यांना कंपनीतर्फे वाहन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच काही अधिकाऱ्यांना बाह्यस्त्रोत्राद्वारे भाडे तत्वावरसुध्दा वाहन पुरविण्यात आले आहे. याबाबतीत कंपनी वाहनांवर होणारा खर्च आणि बाह्यस्त्रोत्राद्वारे भाडे तत्वावर वाहन उपलब्ध करुन देण्यास येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन मुख्य कार्यालयातील वाहन सुविधा मिळण्यास पात्र असलेल्या अधिकाऱ्यांना स्वतःचे खाजगी वाहन कार्यालयीन कामकाजासाठी वापरण्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने प्रशाकीय परिपत्र क्र. ३५६, दि. ०६.०९.२०११ अनुसार मंजुरी देण्यात आली असून त्याकरिता काही अटी व शर्तीच्या अधीन राहून एक ठराविक रक्कम वाहन वापरावर केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती म्हणून देण्याबाबतची तरतुद करण्यात आलेली आहे.

२. आता, व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (प्रकल्प), संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांचेशी विचारविनिमय करुन महाराष्ट्र शासनाने पेट्रोल / डिझेल यांचा स्वतःचे खाजगी वाहन कार्यालयीन कामकाजासाठी वापरणाऱ्या अधिकाऱ्यांकरिता इंधन खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी निश्चित केलेल्या दरांच्या अनुषंगाने मुख्य कार्यालयातील वाहन वापरण्यास पात्र अधिकाऱ्यांना खालील सुधारीत दराने दरमहा प्रतिपूर्ती देण्यास मंजूरी प्रदान केली आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **क)** | कार्यकारी संचालक व तत्सम | (पेट्रोल वाहन) | - | रु.२३,०००/- प्रतिमहा |
| | | (डिझेल वाहन) | - | रु.१९,७००/- प्रतिमहा |
| **ख)** | महाव्यवस्थापक व तत्सम आणि त्यावरील दर्जाचे अधिकारी | (पेट्रोल वाहन) | - | रु.२०,१००/- प्रतिमहा |
| | | (डिझेल वाहन) | - | रु.१६,८००/- प्रतिमहा |

३. उपरोल्लेखित प्रतिपूर्तीचे सुधारीत दर दिनांक ०१ जानेवारी २०१३ पासून लागू राहतील.

४. प्रशाकीय परिपत्रक क्र. ३५६, दिनांक ०६.०९.२०११ मधील इतर अटी व शर्ती अबाधित राहतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

***( संदेश ए. हाके )***
***मुख्य महाव्यवस्थापक (मासं)***

*D:\O&M\Adm.Cir.F.N.-5-Reimbursement of Vehicle Expenses.doc*